

## ■ विभागात अध्यापन केलेले अभ्यागत प्राध्यापक

| | |
|---|---|
| **प्रा. बाळकृष्ण कवठेकर**<br>शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागात अभ्यागत प्राध्यापक म्हणून अध्यापन कार्य. मराठवाडा विद्यापीठात सन 2001 ते 2003 या काळात मराठी विभाग प्रमुख. एक प्रसिद्ध साहित्यिक व जेष्ठ समीक्षक म्हणून लौकिक .'ऐसे कुणबी भूपाळ या कादंबरीचा चिकित्सक अभ्यास' या विषयावर एम.फिल.चे संशोधन. दलित साहित्य : एक आकलन, प्रतिसाद (समीक्षा लेख) वाङ्मयीन चर्चा आणि चिकित्सा, *स्वातंत्र्यवीर सावरकर साहित्य आणि जीवननिष्ठा, हैद्राबादचा मुक्तीसंग्राम- एक उपेक्षित संघर्षगाथा* आदी ग्रंथांचे लेखन. तिसऱ्या समरसता साहित्य संमेलनाचे अध्यक्ष. 32 व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद (2011). |  |
| **प्रा. डॉ. र.बा. मंचरकर**<br>शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागात अभ्यागत प्राध्यापक म्हणून सेवा. मराठी साहित्याचे समीक्षक व संत साहित्याचे अभ्यासक. तौल*निक साहित्य आणि मध्ययुगीन मराठी वाङ्मय, धर्म संप्रदाय आणि मध्ययुगीन मराठी वाङ्मय, भाषाशास्त्र विचार मुक्तेश्वर यांची कविता* (तीन खंडांचे लेखन), *शिक्षण आणि समाज, ज्ञानेश्वरी अध्याय* (पहिला व सातवा), हे प्रमुख ग्रंथ प्रसिद्ध. *वाङ्मयाचे महाविद्यालयीन अध्यापन* (डॉ. दुका संत गौरव ग्रंथ) सामाजिक परिवर्तन आणि मराठी साहित्य या ग्रंथांचे संपादन.<br>महाराष्ट्र राज्य सरकार, भारतीय दलित साहित्य अकादमी दिल्ली यांच्या पुरस्कारांनी सन्मानित. |  |
| **डॉ. प्रकाश कुंभार**<br>विविध महाविद्यालयात अध्यापन कार्य. कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय, कोवाड, ता. चंदगड येथे प्राचार्य म्हणून सेवा. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागात भाषाविज्ञान या विषयाचे अभ्यागत प्राध्यापक तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रात अध्यापन. *कर्णाचे बारसे* (1990), *दलित कथा साहित्य* (1991), *श्री संत शिरोमणी गोरा कुंभार चरित्र* (2002), *दलित साहित्य काही विचार व दिशा* ( 2002), *दलित साहित्य चर्चा* (2006) आणि *उपयोजित भाषाविज्ञान सर्जन उपयोजन* (2015), या ग्रंथांचे लेखन. विविध संस्था पुरस्कारांनी सन्मानित. धारवाड विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे व साहित्य अकादमीच्या ग्रंथ परीक्षण समितीचे सदस्य म्हणून कार्य. |  |

**डॉ.महेंद्र कदम**

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागात दोन वर्षे अभ्यागत प्राध्यापक म्हणून भाषाविज्ञान या विषयाचे अध्यापन. सध्या विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालय टेंभुर्णी, जि. सोलापूर येथे प्राचार्य म्हणून कार्यरत. मराठी कादंबरीकार आणि समीक्षक म्हणून मराठी साहित्यात परिचित. धूळपावलं अगळ, तणस या कादंबऱ्या. *तो भितो त्याची गोष्ट* (कथासंग्रह), *कवितेची शैली* (शैली विज्ञान), *तू जाऊन तीन तप झाली* ( दीर्घ कविता), *कवितेचे वर्तमान* (समीक्षा लेखसंग्रह), *कादंबरी: सार आणि विस्तार* (कादंबरी समीक्षा), *मराठीचे वर्णनात्मक भाषाविज्ञान, टाचाटिभ्याचे क्रांतीपर्व* (संपादन) *मेघवृष्टी: अभ्यासाच्या विविध दिशा* (संपादन) आदी प्रमुख लेखन व संपादन कार्य. सोलापूर विद्यापीठाच्या मानवविज्ञान शाखेचे अधिष्ठाता. त्याचबरोबर महाराष्ट्र शासनाच्या परिभाषा कोश निर्मितीचे ते सदस्य आहेत. भैरू रतन दमाणी पुरस्कारासह अनेक नामांकित पुरस्कारांनी सन्मानित.



**डॉ.हिमांशू भूषण स्मार्त**

मराठी विभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे सन २००० ते २०१२ या कालावधीत ११ वर्ष मराठी विषयाचे अध्यापन केले आहे. 'साठोत्तरी मराठी नाटक काळ आणि अवकाश' या अभ्यास विषयावर त्यांनी पीएच.डी. प्रबंध सादर केलेला आहे. त्याचबरोबर ललित कला केंद्र सावित्री बाई फुले पुणे विद्यापीठ येथे अभ्यागत प्राध्यापक म्हणून काही काळ कार्यरत होते. सध्या भालजी पेंढारकर फिल्म अँड थिएटर अकादमी येथे विभागप्रमुख म्हणून ते कार्यरत आहेत. विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर येथे वाणी कौशल्य आणि रंगभूमी परिचय अभ्यासक्रमाचे संचलन आणि अध्यापन त्यांनी केले आहे. मराठी अभ्यास मंडळ विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर आणि नाट्यशास्त्र अभ्यास मंडळ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक या अभ्यास मंडळावरती सदस्य म्हणून काम पाहिले आहे. नाट्यविश्लेषण, नाटक आणि सौंदर्यशास्त्र, सर्जनशील लेखन, साहित्य विचार आणि समीक्षा साहित्य संवाद, वाणी कौशल्य या अभ्यास विषय अध्यापन आणि संशोधनात त्यांना विशेष रुची आहे.

मराठी प्रायोगिक रंगभूमीवर त्यांच्या नाट्यकृतीनी वेगळा ठसा उमटवला आहे. वाटले होते काही मैल, प्रदर्शन परफेक्ट मिसमेच हे नाट्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. *गंधांचे मौन* हा ललितगद्य संग्रहही प्रकाशित झाला आहे. *मराठी नाटक आणि रंगभूमी, कथा रंग, कविता अभिव्यक्तीची* या पुस्तकांचे संपादन त्यांनी केले आहे. प्रायोगिक रंगभूमीवर नाटक आणि एकांकिकेचे लेखन त्यांनी केले आहे. प्रदर्शन, पुंगीवाला, ढेकर आख्यान, ट्रिपल सीट, दार उघडचं आहे घराचं, जत्रेतलं जायंट व्हील, वाटले होते काही मैल या त्यांच्या नाट्यकृती प्रायोगिक रंगभूमीवर सादर झालेल्या आहेत. महाराष्ट्र टाइम्स दैनिकातून सांस्कृतिक घडामोडींवर भाष्य करणारे अनेक लेख छापून आले आहेत. नाट्यलेखनासाठी झी नाट्य गौरव पुरस्कार, व्यावसायिक राज्य नाट्य महोत्सव उत्कृष्ट लेखक पुरस्कार, महाराष्ट्र फाउंडेशन अमेरिका यांचा रा.शं.दातार नाट्य पुरस्कार, विनोद दोशी फेलोशिप पुणे, झी गौरव पुरस्कार सर्वोत्तम लेखक, नाटककार आचार्य अत्रे पुरस्कार, पारूबाई परदेशी स्मृती कला पुरस्कार यासारख्या अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले आहे.



### डॉ.शरद गायकवाड

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागात अभ्यागत प्राध्यापक म्हणून कार्य .सध्या महावीर महाविद्यालय, कोल्हापूर येथे मराठी विभागात कार्यरत. ‘मराठी साहित्यातील मातंग समाज’ या विषयावर पीएच.डी. प्राप्त असून *मातंग समाज साहित्य आणि संस्कृती* (2015), *अॅट्रॉसिटी अॅक्ट* (2016), *अण्णा भाऊंचा भाऊ - शंकर भाऊ साठे* ( 2017), *बहुजनवादी साहित्य (क्रांतीची आणि बंडाचा मूळ)* ( 2017) आदि ग्रंथ प्रकाशित आहेत. *जागतिकीकरण आणि मराठी साहित्य, जागतिकीकरणाचा अवकाश आणि परिवर्तनाच्या चळवळी, शकुंतला वायदंडे लिखित ‘हिंदी राज्यघटनेचा वारसा अर्थात अस्पृश्यांचे राजकीय हक्क’, फुले, शाहू, आंबेडकर युवा साहित्य संमेलने अध्यक्षीय भाषणे* इत्यादी ग्रंथांचे संपादन त्यांनी केले आहे.

अनेक सामाजिक संस्थांचे पुरस्कार प्राप्त. पहिले फुले शाहू आंबेडकर आणि मार्क्सवादी युवा सांस्कृतिक संमेलन कोल्हापूर (2009) व दुसरे दलित भटके-विमुक्त ओबीसी आदिवासी साहित्य संमेलन नाशिक (2016) या समेलनांचे संमेलनाध्यक्ष. लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोग महाराष्ट्र शासन तज्ज्ञ सदस्य म्हणून काम पाहिले. महाराष्ट्र शासनाच्या अण्णाभाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समिती वर सदस्य म्हणून निवड.



### डॉ.अरुण शिंदे

नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स कोल्हापूर येथे मराठी विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. तरुण पिढीतील महत्त्वाच्या संशोधकांमध्ये त्यांचे स्थान असून सत्यशोधकीय नियतकालिके, सत्यशोधक केशवराव विचारे, देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार, भाषिक सर्जन आणि उपयोजन, मुकुंदराव पाटील यांच्या कथा, सार्वजनिक सत्यधर्म, सत्यशोधकाचे शेतीविषयक विचार, कृष्णाक्षर (डॉ. कृष्णा इंगोले: व्यक्ती आणि वाङ्मय आदी प्रकाशित ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत.

शिवाजी विद्यापीठ, सोलापूर विद्यापीठ अभ्यास मंडळाचे सदस्य व शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे सचिव म्हणून त्यांनी कार्य केले आहे. ते शिविम संशोधन पत्रिकेचे कार्यकारी संपादक होते . दैनिक महाराष्ट्र टाईम्स मध्ये स्तंभलेखन करतात.



### डॉ. नीला जोशी

शिवाजी विधापीठाच्या मराठी विभागात सन 2016 ते 2020 या काळात अभ्यागत प्राध्यापक.सध्या डी.आर. माने महाविद्यालय, कागल येथे मराठी विषयाच्या प्राध्यापक म्हणून कार्यरत. 1) मराठी स्त्री गिते: आशय आणि आविष्कार, 2)लोकसाहित्याचे मातृदेवता रेणुका, 3) ठेव उखण्यांचा या प्रकल्पासह युजीसी कडे एकूण चार प्रकल्प सादर. आकाशवाणी सांगली आणि कोल्हापूर येथे जवळपास पन्नास व्याख्याने दिली आहेत.

विविध नियतकालिकांमध्ये संशोधन निबंध आणि ललित लेखन प्रकाशित झाली आहेत.‘मराठी लोकसाहित्याचे स्त्रिजितांचा वाङ्मयीन अभ्यास’ या विषयावर पीएच.डी. पदवी प्राप्त.



| | |
|---|---|
| **डॉ.सुजय पाटील**<br>शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागात अभ्यागत प्राध्यापक म्हणून अध्यापन. कमला कॉलेज कोल्हापूर येथे सध्या मराठी विभागप्रमुख म्हणून कार्यरत. वीस वर्ष मराठी विषयाच्या अध्यापनाचा अनुभव. 'श्री संत मारुती महाराज माकणेकर यांच्या अप्रकाशित वाङ्मयाचा अभ्यास' या विषयावर पीएच.डी. प्राप्त. ग्रंथ परिक्षणे, संशोधनात्मक लेख, चरित्रपर लेखन प्रसिद्ध. विविध वृत्तपत्रांसाठी लेखन. कोल्हापूर महानगरपालिका, संत गाडगे महाराज अध्यासन, कोल्हापूर. राज्य वारकरी परिषद कोल्हापूर यांचे पुरस्कार प्राप्त. पहिल्या ऑनलाईन विश्व मराठी संमेलनाचे निमंत्रक म्हणून जबाबदारी. |  |
| **डॉ.रमेश साळुंखे**<br>देवचंद महाविद्यालय अर्जुननगर (निपाणी) येथे मराठी विभागात सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत. ‘राजकीय नाटकांची संकल्पना आणि गो. पु. देशपांडे यांची नाट्यसृष्टी’ या विषयावर पीएच.डी. प्राप्त. सन 2016 पासून शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागात अभ्यागत प्राध्यापक. 'सागरवेडी' ही पत्रात्म कादंबरी दैनिक केसरी मधून क्रमशः प्रकाशित. ऑल फार ऑल फॉर यू , भूक, गलबत, काळोख शोधतो पत्ता, मरणगंध, पहाटगाणे, प्रवाह, यँना इत्यादी एकांकिकांचे लेखन. मान्यताप्राप्त नियतकालिकातून साहित्य प्रकाशित.<br>महादेव मोरे यांच्या जीवन पटावर आधारित ‘पीठाक्षर’ या लघुपटाची निर्मिती. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळावर कार्य. |  |